ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ पुणें, बुधवार तारीख २३ मे, १९५६ अंक २१

## विविध माहिती

**चीन–पाकिस्तान व्यापारी करार** —चीन आणि पाकिस्तान ह्यांनीं परस्परांतील व्यापारी करारावर नुकत्याच सह्या केल्या. कराराच्या अटींप्रमाणें पाकिस्तान चीनकडून ३ लाख टन कोळसा विकत घेणार आहे. कोळशाची किंमत ३ कोटी रुपये होईल. पुढील वर्षाच्या जून महिन्यांपर्यंत सर्व कोळसा पाकिस्तानला पुरविण्यांत येईल. गेल्या मार्चमध्यें पाकिस्ताननें चीनकडून १ कोटी रुपये देऊन १,२५,००० टन कोळसा घेण्याचा करार केला होता.

**काश्मीर सरकारचें दैनिक**—काश्मीर सरकारचें माहितीखातें १ जून पासून स्वतःचें इंग्रजी दैनिक चालूं करीत आहे. राज्यांत येणाऱ्या हौशी प्रवाशांना स्थानिक वृत्त कळावें आणि लोकांना त्यांच्या वाङमयाची व संस्कृतीची ओळख व्हावी, म्हणून तें चालूं करण्यांत येत आहे. त्याशिवाय काश्मीरच्या पंचवार्षिक योजनेच्या प्रगतीची माहितीहि त्यांत वेळोवेळीं देण्यांत येईल.

**चंबळ नदीवरील धरण** —मध्यभारतावरील चंबळा नदीवर बांधण्यांत येणाऱ्या धरणाच्या विस्तारांत ९ खेडीं बुडणार असल्यानें तेथील लोकांची सोय करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे. ह्या लोकांची पुनर्वसाहत करण्यासाठीं १,००० एकर जंगलव्याप्त जमीन साफ करण्यांत आली असून, ६०० एकर पडीत जमीन प्रथमच नांगरण्यांत आली आहे. चंबळ नदीच्या धरणाच्या कामावर रोज सरासरी ७,००० मजूर खपत आहेत.

**रतलाम येथील गाड्या जुळविण्याची व्यवस्था**—रतलाम स्टेशनवरील उतारूंची व मालाची वाहतूक गेल्या कांहीं वर्षांत वाढत चालली आहे. वाहतुकीची व्यवस्था अधिक कार्यक्षम करण्यासाठीं तेथें गाड्या जुळविण्यासाठीं आणखी एक यार्ड बांधण्यांत आला असून, जुन्या यार्डचा विस्तारहि करण्यांत आला आहे. उतारूंच्या गाड्यांची जुळवाजुळव करण्यासाठींहि स्वतंत्र यार्ड बांधण्यांत येणार आहे. ह्या सर्व कामासाठीं ६४ लाख रुपये खर्च येईल.

**आयुर्विम्याच्या विभागीय कचेऱ्या** —आयुर्विम्याच्या कॉर्पोरेशनचा कायदा चिकित्सा समितीकडून शिफारशीसह परत लोकसभेपुढें आला आहे. कॉर्पोरेशनची एक विभागीय कचेरी कानपूर येथें असावी अशी एक शिफारस करण्यांत आली आहे.नागपूर इन्शुअरन्स इन्स्टिट्यूटनें अर्थमंत्र्यांना अशी विनंती केली आहे कीं अशीच एक कचेरी नागपूरलाहि उघडण्यांत यावी. नागपूरला सुमारें ४० प्रमुख विमा कंपन्यांच्या शाखा आहेत, व विमा कंपन्यांनीं बांधलेल्या प्रशस्त इमारतीहि आहेत.

**चंद्रलोकावर मानवी वसाहत** —चंद्रलोकावर व जवळच्या इतर ग्रहांवर मानवी वसाहती स्थापन करणें २० वर्षांच्या कालावधींत शक्य कोटींत येईल असा विश्वास रॉकेटसंबंधीच्या एका जर्मन तंत्रज्ञानें व्यक्त केला आहे. ह्या कामाची प्राथमिक तयारी म्हणून मनुष्याला चंद्रावर प्लॅस्टिकचे अगर कांचेचे पोकळ फुगे बांधावे लागतील. फुग्यांत राहून अंतरिक्षाचें परीक्षण केल्यावर आणखी मोठालीं घरें बांधतां येतील. अशी माहिती त्यानें प्रकट केली आहे.

**अमेरिकन मालकीचीं हॉटेल्स** —अमेरिकेंतील हिल्टन हॉटेल्स कॉर्पोरेशन हिंदुस्थानांत आपल्या मालकीचीं बरींच हॉटेल्स काढण्याचा विचार करीत आहे. दिल्ली व मुंबई ह्या ठिकाणांवर कॉर्पोरेशनची विशेष नजर आहे. अमेरिका परदेशांना जी मदत देत आहे तिच्यांत अमेरिकन मालकीच्या हॉटेल्समुळें भर पडेल. कारण, अमेरिकन प्रवाशांचे तांडे हॉटेल्समधील सुखसोयींमुळें अधिक येतील. त्यांच्यामुळें भारताला डॉलर्स मिळतील.

**कागदाच्या कारखान्यासाठीं कच्चा माल** —कागदाच्या कारखान्यांना कच्चा माल म्हणून कांहीं प्रकारच्या लाकडापासून तयार केलेला लगदा वापरावा लागतो. सध्यां हा लगदा परदेशांतून आयात करावा लागतो. मद्रास सरकार अशा प्रकारचीं झाडें लावण्याची योजना आखीत आहे. मेटुर येथें कागदाचा कारखाना काढण्याचा विचारहि सरकार करीत आहे. कारखाना खाजगी मालकीचा असेल व त्यासाठीं ३·५ कोटी रुपये भांडवल लागेल.

**नोटांसाठीं लागणारा कागद** —भारतीय सरकारनें मध्यप्रदेशांतील होशंगाबाद ह्या ठिकाणीं नोटा छापण्यासाठीं लागणारा कागद तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. हा कागद तयार करण्यासाठीं मुख्यतः चिंध्यांचा उपयोग करतात. शिंप्यांच्या दुकानांतील चिंध्या ह्या कामासाठीं सध्या पाश्चात्य कारखानदारांकडे निर्यात करण्यात येतात. भारताच्या आसपासच्या देशांकडून चलनी नोटांच्या कागदाची बरीच मागणी करण्यांत येत आहे.

**झ्यूरिक येथील विमानांचे प्रदर्शन** —झ्यूरिक येथें भरणाऱ्या विमानांच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत अमेरिका भाग घेणार आहे. जेटवर चालणारीं अग्नयावत् विमानें व प्रेरित आयुधें ही लष्करी महत्त्वाची सामग्रीहि प्रदर्शनांत मांडण्यांत येईल. प्रदर्शनांत रशिआहि भाग घेणार आहे. त्याशिवाय झेकोस्लोव्हाकिया, ब्रिटन, कॅनडा, स्वीडन, फ्रान्स, इत्यादि राष्ट्रांनाहि प्रदर्शनांत भाग घेण्याचें आवाहन करण्यांत आलें आहे.

## संपविरोधी कायद्याचे दुष्परिणाम

दक्षिण आफ्रिकेच्या सरकारनें नेटिव्ह लेबर सेटलमेंट ऑफ डिस्प्यूट्स् ॲक्ट कायदा मंजूर केलेला आहे. ह्या कायद्यांतील तरतुदीप्रमाणें आफ्रिकन कामगारांना संप करतां येत नाहीं. तो केला तर बेकायदा होतो. ह्या कायद्यामुळें दक्षिण आफ्रिकेंतील कारखानदारांचें हजारों पौंडांचें नुकसान होत आहे. कायदा केल्यामुळें आफ्रिकन कामगार संपावर जाण्याचें थांबलें आहे असें मात्र नाहीं. गेल्या महिन्यांत बेकायदा संप करण्याच्या आरोपावरून फक्त जोहान्सबर्ग विभागांतच ४२० खटले भरण्यांत आले होते. कोर्टांत खटल्यांचें काम चालू असतांना कांहीं कारखाने तर संपूर्णतया बंद होते. अर्थातच पुष्कळशा कारखान्यांचें उत्पादन थांबलें आणि कांहीं कारखान्यांचें बऱ्याच प्रमाणांत घटलें. कारखान्यांतील उत्पादन थांबणें त्यांच्या मालकांना अनिष्ट वाटल्यामुळें कांहीं कारखानदारांनीं आपल्या कामगारांना झालेल्या दंडाच्या रकमा स्वतःच भरल्या आणि त्यांना सोडवून आणून काम चालूं केलें. गेल्या सहा महिन्यांत ह्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळें दक्षिण आफ्रिकेंतील कापडाच्या कारखान्यांचें निदान २०,००० पौंड तरी नुकसान झालें असावें असा अंदाज करण्यांत आला आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठीं सरकारनें स्वतंत्र अधिकारी नेमले आहेत. आफ्रिकन कामगारांनीं केलेल्या संपावर सक्त नजर ठेवण्याचें त्यांचें काम आहे. उलट, कारखान्यांच्या दैनंदिन कामांत खीळ पडणें आणि सरकारी अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप होणें ह्या गोष्टी कारखानदारांना नको आहेत. त्यामुळें कारखान्यांत औद्योगिक भांडण अगर संप झाले तरी ते दडपून ठेवण्याची प्रवृत्तीहि कांहीं युरोपियन कारखानदारांत दिसून येत आहे; ह्या कारखानदारांना नेहमींच्या औद्योगिक अडचणीबरोबरच परकीय कारखानदारांच्या स्पर्धेलाहि तोंड द्यावें लागत आहे. म्हणून कारखाना चालू ठेवणें त्यांना 'अत्यंत महत्त्वाचें वाटतें. एका कापडाच्या गिरणींतील १६९ कामगारांना बेकायदा संप केल्याबद्दल प्रत्येकीं १० पौंड दंडाची शिक्षा देण्यांत आली. पण कारखान्याच्या मालकानें त्यांच्यातर्फे १६९० पौंड रक्कम भरली व त्यांना सोडवून आणलें. त्यांना तुरुंगांत जाऊं देऊन कारखाना बंद करण्याची त्याची तयारी नव्हती.

---

## पगारावरून उमेदवाराची पात्रता ठरविणार

इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसमध्यें तातडीनें जी जादा भरती करण्यांत यावयाची आहे, त्या भरतीच्या अटींपैकीं एक अट अशी आहे, कीं उमेदवाराला एप्रिल, १९५६ पूर्वी वर्षभर दरमहा किमान ३०० रु. पगाराची नोकरी सतत असली पाहिजे. म्हणजे, गरीबी हा प्रस्तुत नोकरीचे मार्गांतील मोठाच अडसर आहे. पगारावरून मूलभूत लायकी ठरविणें वेडेपणाचें आहे, आणि अशा रीतीनें किमान लायकी ठरवून त्यांतूनच नवे अधिकारी निवडणें अन्यायाचें आहे. मध्यवर्ती सरकारचा पगार राज्य सरकारांच्या पगारापेक्षा ज्यास्त असतो; कांहीं राज्यांत इतर राज्यांपेक्षा पगार कमी मिळतो आणि खाजगी नोकरींतील पगार धंद्याच्या किफायतशीरपणावर अवलंबून राहतो. अशा परिस्थितींत, ३०० रु. खालच्या पगाराच्या लायक उमेदवारांनाहि परीक्षेस बसण्याची संधीहि मिळूं नये, हें अजब आहे.

## सांगली बँकेस लायसेन्स मिळाला

बँकिंग कंपनीज ॲक्ट, कलम २२ (१) खालीं दि सांगली बँक लि. ला भारतांत बँकिंगचा व्यवसाय करण्याचा लायसेन्स मिळाला आहे. लायसेन्सचा नंबर मुंबई २४ असा आहे.

---

**संशोधनासाठीं बक्षीस**—उत्तर प्रदेश सरकारचे मुख्य मंत्री डॉ. संपूर्णानंद ह्यांनीं नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस ह्या संस्थेच्या हवालीं १०,००० रुपयांची रक्कम केली आहे. अंतरिक्षांत ग्रहांच्या दरम्यान प्रवास करण्यासंबंधीं उपयुक्त शोध लावणाऱ्या हिंदी शास्त्रज्ञास ती मिळावयाची आहे. ॲकॅडमीनें ह्या विषयावरील निबंध मागविले असून ते १५ ऑक्टोबर पूर्वी संस्थेकडे पोंचले पाहिजेत. ग्रहांच्या दरम्यान प्रवास करण्यास उपयोगी पडेल असा कोणताहि शोध चालेल.

**रेल्वेच्या नोकरवर्गासाठीं**—चालू आर्थिक वर्षांत भारतीय रेल्वे आपल्या नोकरवर्गाच्या सुखसोयींसाठीं १४·२३ कोटी रुपये खर्च करणार आहे. रकमेंपैकीं ६·८५ कोटी रुपये नोकरांसाठीं नवे गाळे बांधणें, जुन्या बिऱ्हाडांची सुधारणा करणें, पाण्याचा पुरवठा करणें, रेल्वे वसाहतीमधील रस्त्यांवर दिवे लावणें, इत्यादि प्रकारच्या कामावर खर्च होणार आहेत. नवीन घरें बांधतांना तिसऱ्या व चौथ्या वर्गाच्या रेल्वे-नोकराकडे अधिक लक्ष देण्यांत येईल.

**पोलादाच्या कारखान्याचा विस्तार**—हिंदुस्थान स्टील लिमिटेड ह्या कलकत्त्यामधील कारखान्यासाठीं तीन नव्या भट्ट्या बांधण्याचें काम पश्चिम जर्मनींतील एका प्रसिद्ध कारखान्याला मिळालें आहे. ह्या भट्ट्यांमधून दररोज १,००० मेट्रिक टन पोलाद निर्माण करतां येईल. सर्व भट्ट्यांची मिळून किंमत १० कोटी मार्कस आहे. १९५८ च्या अखेरीस पहिली भट्टी उभारली जाऊन प्रत्यक्ष उत्पादन करूं लागेल.

**रशिआचें नवें हेलिकॉप्टर**—रशिअन विमानविषयक एंजिनिअर्सनीं ४ टन वजन वाहूं शकेल एवढें मोठें 'हेलिकॉप्टर' जातीचें विमान बांधलें आहे. ह्या प्रकारचें विमान जवळ जवळ सरळच भूमिपासून वर उडूं शकतें. इतर देशांत ह्या प्रकारचीं जीं विमानें बांधलीं जातात तीं १ ते १॥ टन इतकेंच वजन नेऊं शकतात असें समजतें. रशिअन विमानांत एंजिनांचीं जुळणी अशी करण्यांत आली आहे कीं, दोहोंपैकी एक एंजिन बंद पडल्यास दुसऱ्याच्या साह्यानें तें चालूं ठेवतां येतें.

**सिमेंटचा नवा कारखाना**—म्हैसूर राज्यांत रोज ३५० टन सिमेंट उत्पादन करूं शकणारा एक कारखाना लवकरच काढण्यांत येणार आहे. हा कारखाना खाजगी भांडवलाच्या सहकार्यानें काढण्यांत येणार आहे. पण जरूर पडल्यास म्हैसूरचें सरकारहि कांहीं भांडवल घालण्यास तयार होईल. कारखान्यासाठीं १·६ कोटी रुपये भांडवल लागेल. सिमेंट उत्पादन करणारा म्हैसूर राज्यांतील तो दुसरा कारखाना होईल.

**मॉस्को-दिल्ली विमानमार्ग**—मॉस्को ते दिल्ली ह्या विमानमार्गावरील फेऱ्या करण्यासाठीं रशिआ 'टी. यू. १०४' ह्या प्रकारचीं जेटवर चालणारीं विमानें वापरणार आहे. अशा प्रकारचें विमान रशिआनें नुकतेंच ब्रिटनला धाडलें होतें. त्यावेळीं त्याची लंडनमध्यें बरीच प्रशंसा करण्यांत आली होती. रशिआ सध्यां हीं विमानें मोठ्या प्रमाणावर तयार करीत असून लवकरच विकूं लागेल, असें समजतें.

# अर्थ

बुधवार, ता. २३ मे, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पाकिस्तानाकडून भारताचें येणें

भारत व पाकिस्तान ह्यांचेमधील आर्थिक प्रश्नांबाबत बोलणीं नुकतींच संपल्यानंतर नव्या दिल्लींतून एक पत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें, त्यांत म्हटलें आहे कीं, वादाचा विषय असलेल्या प्रश्नांबाबत प्रत्यक्ष वस्तुस्थितीविषयीं बरेंच एकमत झालें; आतां दोन्हीं देशांच्या मंत्र्यांना अखेरचा निर्णय घेतां येणें सोपें जाईल. भारताची फाळणी होण्याच्या वेळीं जो करार झाला, त्या-अन्वयें पाकिस्ताननें भारताला बरीच मोठी रक्कम द्यावयाची आहे. पण हिशेबाबद्दल तंटा करून आणि आपलें स्वतःचें खोटेंच येणें फुगवून दाखवून पाकिस्ताननें कर्जफेडीचे बाबतींत टाळाटाळ चालविलेली आहे. फाळणीनंतर, जुन्या अविभक्त भारताच्या सर्व कर्जाची जबाबदारी भारतानें स्वतःवर घेतली, पाकिस्ताना-च्या वाट्याची कर्जाची रक्कम तो देश भारताला देऊन फेडील अशी अपेक्षा होती. त्याप्रमाणें ठरलेंहि होतें. फाळणीनंतर पांच वर्षांनीं पाकिस्ताननें कर्जफेडीस प्रारंभ करावा व फाळणीपासून पन्नास वर्षांत सबंध कर्जाची फेड व्हावी, अशी योजना ठरलेली होती. त्याप्रमाणें, १९५२ पासूनच पाकिस्ताननें कर्जफेडीस प्रारंभ करणें जरूरीचें होतें, आणि त्याप्रमाणें पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांनीं ५ कोटी रुपयांची तरतूदहि केली होती. इकडे भारताच्या अर्थमंत्र्यांनीं ९ कोटी रुपयांची अपेक्षा करून त्याप्रमाणें अंदाजपत्रकांत अपेक्षित उत्पन्न दाखविलें होतें. पण १९५२ मध्येंहि व पुढेंहि कधीं पाकिस्तानानें ह्या कर्जाचे पोटीं एक पैहि भारताला दिली नाहीं. पाकिस्तानानें भारताला सुमारें ३०० कोटी रुपये द्यावयाचें आहेत. त्या कर्जाचा बोजा आज भारत सरकारला वहावा लागत आहे. पाकिस्तानानें त्यांपैकी २४० कोटींचें देणें मान्य केलें आहे, अशी बातमी आहे. त्याची परतफेड सुरू करण्यास पाकिस्ताननें विलंब लावण्याचें वास्तविक कारण नाहीं; थोड्या-फार वादासाठी सबंध रक्कमच अडकवून ठेवणें रास्त नाहीं. फाळणीच्या वेळीं रिझर्व्ह बँकेची स्टर्लिंगमध्यें जी शिल्लक होती, त्याचा वांटा पाकिस्तान आतां मागूं लागला आहे. वास्तविक, ह्या स्टर्लिंग शिलका भारत सरकारच्या शिलका नव्हत्याच मुळीं. पाकि-स्तानाला रिझर्व्ह बँकेच्या सोन्याचा व स्टर्लिंग शिलकांचा वाटा पाकिस्तानांत प्रचलित असलेल्या चलनाचे प्रमाणांत केव्हांच मिळालेला आहे. १ जुलै १९४८ पासून हिंदी रिझर्व्ह बँकेची, पाकिस्तानची मध्यवर्ती बँक ही भूमिका नाहींशी झाली व स्टेट बँक ऑफ पाकिस्ताननें ती भूमिका पत्करून व्यवसायास प्रारंभ केला. त्याच वेळीं, रिझर्व्ह बँकेनें आपल्या जिंदगीपैकी जरूर तें सोनें व स्टर्लिंग रोखे स्टेट बँक ऑफ पाकिस्तानला देऊन टाकलें. आतां रिझर्व्ह बँकेजवळ जें सोनें व स्टर्लिंग शिलकी आहे, ते रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटांच्या तारणासाठी आहे. त्यावर पाकिस्तान सरकारचा कांहींहि हक्क पोंचूं शकणार नाहीं.

---

## भारताचें औद्योगिक धोरण

पंतप्रधान श्री. नेहरू यांनीं लोकसभेंत ३० एप्रिल रोजीं भारताचें नवें औद्योगिक धोरण विशद केलें. या धोरणांत सरकारी क्षेत्राचा अधिक विस्तार संकल्पित असून त्यामुळें अधिक धंद्यांच्या भावी विकासाची जबाबदारी प्रत्यक्षपणें सरकारवर येऊन पडणार आहे. १९४८ च्या औद्योगिक धोरण-विषयक ठरावांत सरकारी क्षेत्रांत ६ उद्योगधंद्यांचा समावेश होतो तर नव्या ठरावास जोडलेल्या परिशिष्टांत १७ उद्योग-धंद्यांचा समावेश करण्यांत आला आहे.

या ठरावांत खाजगी क्षेत्राचा निर्देश करतांना असें म्हटलें आहे कीं, या क्षेत्रांतील उद्योगधंदे सरकारच्या सामाजिक आणि आर्थिक धोरणाच्या चौकटींत बसलेच पाहिजेत; अशा उद्योग-धंद्यांवर इंडस्ट्रीज (डेव्हलपमेंट अँड रेग्युलेशन) ॲक्ट व इतर संबंधित कायदे यांचें नियमन राहील. राष्ट्रीय योजनेचीं उद्दिष्टें व लक्ष्यें यांशीं सुसंगत राहाणारें स्वातंत्र्य खाजगी उद्योग-धंद्यांसहि दिलें जाईल असें आश्वासन या ठरावांत देण्यांत आलें आहे. तसेंच एकाच उद्योगधंद्यांतील सरकारी व खाजगी क्षेत्रांस न्याय्य व निःपक्ष वागणूक मिळेल असें आश्वासनहि या ठरावांत आहे. ह्या धोरणानुसार सरकारला उत्पादनाचा कोठलाहि धंदा हातीं घेतां येईल.

हा आठ पानी ठराव अतिशय व्यापक असून त्यांत व्यव-स्थापकवर्ग, कामगार-संबंध आणि सरकारी उद्योगधंद्यांची व्यवस्था यासंबंधीं सरकारचीं मतें मांडण्यांत आलीं आहेत. सरकारनें नियोजन मंडळाबरोबर विचार करून उद्योगधंद्यांचे तीन विभाग करण्याचें ठरविलें असल्याचें या ठरावांत म्हटलें आहे.

देशाच्या आर्थिक घडींत कुटीरोद्योग, ग्रामोद्योग व छोटे उद्योगधंदे यांच्या कामगिरीवर भर देऊन या ठरावांत असें म्हटलें आहे कीं, सरकार छोट्या उत्पादकाच्या स्पर्धाशक्तींत वाढ करण्याच्या उपाययोजनांवर आपले प्रयत्न केंद्रित करील. तसेंच औद्योगीकरणापासून एकूण देशाच्या आर्थिक व्यवस्थेस लाभ व्हावा म्हणून निरनिराळ्या विभागांतील विकास पातळींतील विषमताहि हळुहळु कमी करण्यांत यावी असेंहि या ठरावांत नमूद केलें आहे.

व्यवस्थापकवर्ग व कामगारसंबंध यांचा निर्देश करतांना सदर ठरावांत असें म्हटलें आहे कीं, समाजवादी लोकशाहींत कामगार वर्ग हा विकासाच्या कार्यांतील एक भागीदार असल्यानें त्यानें त्यांत उत्साहानें भाग घेतला पाहिजे आणि कामगारांनीं व तंत्रज्ञांनीं शक्य तेथें हळुहळु व्यवस्थाकार्याशीं संबंध जोडावा. या बाबतींत सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांनीं उदाहरण घालून दिलें पाहिजे.

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY.

*Balance Sheet as at 31st December, 1955.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital** | | |
| 1,089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560—0—0 | |
| 30,005 Ordinary Shares of Rs. 50/- each ... | 15,00,250—0—0 | 15,43,810—0—0 |
| **Issued & Subscribed Capital** | | |
| 1,089 6% Cumulative ( Redeemable after 5 years ) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560—8—0 | |
| 15,005 Ordinary Shares of Rs. 50/- each ... | 7,50,250—0—0 | 7,93,810—0—0 |
| **Called and Paid up Capital** | | |
| 1,089 6% Cumulative ( Redeemable after 5 years ) Preference Shares @ Rs. 25/- each ... | 27,225—0—0 | |
| 15,005 Ordinary Shares @ Rs. 25/- each ( out of which 5 shares are fully paid ) ... | 3,75,250—0—0 | |
| | 4,02,475—0—0 | |
| Less calls unpaid ... | 2,290—0—9 | |
| | 4,00,185—0—0 | |
| Add Forfeited Shares ... | nil | 4,00,185—0—0 |
| Calls in Advance | | 290—0—0 |
| **2. Reserve Fund and Other Reserves** | | 1,07,000—0—0 |
| **3. Deposits and Other Accounts :** | | |
| Fixed Deposits & Recurring Deposits ... | 22,58,642—0—6 | |
| Savings Bank Deposits ... | 22,91,749—0—5 | |
| Current Accounts, Contingency Accounts, etc. ... | 10,49,040—5—1 | 55,99,431—6—0 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| ( i ) In India ... | nil | |
| ( ii ) Outside India ... | nil | nil |
| **Particulars** | | |
| ( i ) Secured ( against Pledge of G. P. Notes ) nil ... | | |
| ( ii ) Unsecured nil ... | | |
| **5. Bills Payable** | | 9,056—2—6 |
| **6. Bills For Collection, being Bills Receivable as per contra** | | |
| ( i ) Payable in India ... | 1,76,410-14—3 | |
| ( ii ) Payable outside India ... | nil | 1,76,410-14—3 |
| **7. Other Liabilities** | | 51,044—8—9 |
| **8. Acceptances, Endorsements and other obligations per contra** | | nil |
| **9. Profit and Loss Account.** | | |
| Profit as per last Balance-Sheet. ... | 25,357—9—0 | |
| Less appropriations :— | | |
| Reserve Fund Rs. 6,000—0—0 | | |
| Investment Depreciation Fund Rs. 1,000—0—0 | | |
| Dividend @ 6% on 6% C. R. P. Shares Rs. 1,225—0—0 | | |
| Dividend @ 2% on Ordinary Shares ( Tax free ) Rs. 7,460—0—0 | | |
| Provision for Income-tax Rs. 9,672—9—0 | 25,357—9—0 | |
| | ... | |
| Add Profit for the year brought from the Profit and Loss Account ( subject to depreciation and income tax. ) ... | 21,083-12—0 | 21,083-12—0 |
| **10. Contingent Liabilities** | | |
| In respect of partly paid shares held by the Bank on behalf of constituents Rs. 2,350—0—0 | | |
| Total Rs. ... | | 63,64,501-11—6 |

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY.

***Balance Sheet as at 31st December, 1955.***

## PROPERTY AND ASSETS

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash** | | |
| In hand and with Reserve Bank and State Bank (Including Foreign Currency Notes) ... | | 4,97,217—4—3 |
| **2. Balances with other Banks** ( In current accounts ) | | |
| (i) In India ... | 4,20,951-11—9 | |
| (ii) Outside India ... | nil | 4,20,951-11—9 |
| **3. Money at Call and Short Notice** | | 1,00,000—0—0 |
| **4. Investments (at cost)** | | |
| Govt. Securities of the Face value of Rs.24,25,050/- ( Market value Rs. 21,61,857-14-0. | | |
| (i) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments. ... | 24,01,035-10—0 | |
| (ii) Shares - Ordinary Shares of a Co-op. Bank, fully paid ( at cost ) ... | 60—0—0 | |
| (iii) Debentures or Bonds. ... | nil | |
| (iv) Other Investments. ... | nil | |
| (v) Gold ... | nil | 24,01,095-10—0 |
| **5. Advances** | | |
| (Other than bad and doubtfull debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors) | | |
| **(i) Loans, Cash Credits, Overdrafts, etc.** | | |
| (i) In India 20,34,753—4—9 | | |
| (ii) Outside India nil | 20,34,753—4—9 | |
| **(ii) Bills Discounted and Purchased.** (excluding Treasury Bills of the Central and State Governments ). | | |
| (i) Payable in India 1,87,177—9—0 | | |
| (ii) Payable outside India nil | 1,87,177—9—0 | 22,21,930-13—9 |
| **Particulars of Advances** *( See Page 166 )* | | |
| **. Bills Receivable, being Bills For Collection As per contra** | | |
| (i) Payable in India ... | 1,76,410-14—3 | |
| (ii) Payable outside India ... | nil | 1,76,410-14—3 |
| **. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and other Obligations as per contra** ... | | nil |
| **. Premises ( at cost ):** | | |
| As per last Balance Sheet. ... | 3,45,997—5—9 | |
| Additions during the year. ... | 29,173—7—0 | |
| | 3,75,170-12—9 | |
| Less-Depreciation up to 31-12-54. ... | 6,370—0—0 | 3,68,800-12—9 |
| **Furniture and Fixtures at Cost** | | |
| As per last Balance Sheet. ... | 60,763—3—1 | |
| Additions during the year. ... | 792—9—3 | |
| | 61,555-12—4 | |
| Less sales during the year. ... | 35—0—0 | |
| | 61,520-12—4 | |
| Less Depreciation up to 31-12-1954. ... | 7,218—4—7 | 54,302—7—9 |
| **Safe Deposit Vault Equipment ( at cost )** | | |
| As per last Balance Sheet. ... | 37,080—2—0 | |
| Additions during the year. ... | nil | |
| | 37,080—2—0 | |
| Less Depreciation up to 31-12-54. ... | 931—2—0 | 36,149—0—0 |
| **. Other Assets including silver** | | |
| Sundry Assets. | 2,924—8—0 | |
| Interest accrued on Govt. Securities. ... | 22,046—6—0 | |
| Income Tax deducted at source. ... | 17,777—9—0 | |
| Stock of Printing ( at cost ). ... | 25,290—6—3 | |
| Library ( at cost ). ... | 501—1—9 | |
| Stamp in stock. ... | 670—9—3 | |
| Branch adjustments. ... | — | |
| Due from Bank in liquidation (not provided for). ... | 17,460—9—0 | |
| Advance payment of Municipal Tax ... | 972—0—0 | 87,643—1—0 |
| **Non-Banking Assets Acquired in satisfaction of Claims** ... | | nil |
| Total ... | | 63,64,501-11—6 |

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1955 on page 165.**

| | Particulars of advances :— | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| ( i ) | Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 14,14,943-15-5 |
| ( ii ) | Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 2,10,245-6-6 |
| (iii) | Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 5,41,126-7-10 |
| ( iv ) | Debts considered doubtful or bad not provided for ... | 55,615-0-0 |
| | | 22,21,930-13-9 |
| ( v ) | Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 1,09,217-8-11 |
| ( vi ) | Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | nil |
| (vii) | Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 1,31,833-1-0 |
| (viii) | Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | nil |
| ( ix ) | Due from Banking Companies ... | nil |

***Profit and Loss Account for the Year ended 31st December, 1955***

| EXPENDITURE | Rs. As.Ps. | INCOME | Rs. As.Ps. |
|---|---|---|---|
| 1. Interest paid on Deposits, Borrowings, etc. ... | 1,22,594-11-8 | (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary Provisions) | |
| 2. Salaries and Allowances and Provident Fund : ( including amount paid to Managing Directors Rs. 12,432-8-0 | 95,667-8-0 | 1. Interest and Discount ... | 2,44,305-11-8 |
| | | 2. Commission, Exchange, Brokerage | 13,010-9-7 |
| | | 3. Rents ... | 10,750-12-0 |
| 3. Directors' & Local Committee members' fees & allowances ... | 1,160-0-0 | 4. Net Profit on sale of Investments, Gold & Silver, Land, Premises and other Assets ( not credited to Reserves or to any particular Fund or Account ) ... | nil |
| 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | 11,183-5-3 | | |
| 5. Law Charges ... | 511-2-6 | 5. Net Profit on Revaluation of Investments, Gold & Silver, Land, Premises and other Assets ( not credited to Reserves or to any particular Fund or Account) ... | nil |
| 6. Postage, Telegrams and Stamps | 5,365-8-9 | | |
| 7. Auditor's Fees ... | 700-0-0 | | |
| 8. Depreciation on and Repairs to the Banking Company's Property | 0-0-0 | | |
| 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 6,302-8-0 | 6. Income from Non-Banking Assets and Profit from Sale of or dealing with such Assets ... | nil |
| 10. Loss from Sale of or dealing with Non-Banking Assets ... | nil | 7. Other receipts : ... | 9,232-11-5 |
| 11. Other expenditure : ... | 12,731-4-6 | | |
| 12. Balance of Profit (Subject to Depreciation & Income-tax ) ... | 21,083-12-0 | | |
| Total Rs. ... | 2,77,299-12-8 | Total Rs. ... | 2,77,299-12-8 |

**M. K. Ternikar**
*Accountant.*

**N. N. Kshirsagar,**
**R. B. Salvekar,**
*Managing Directors.*

**K. P. Joshi,** *Chairman.*
**K. M. Mahajan,**
*Vice-Chairman.*
**B. B. Walvekar,**
**Mrs. Indumatibai R. Phadake,**
**B. P. Kelkar,**
**R. B. Girme,**
**R. P. Damodare,**
*Directors.*

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have examined the annexed Balance Sheet of the Bharat Industrial Bank Limited as on 31st December, 1955, and the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the authenticated returns of the Branches and report that :—

(1) We have obtained all the information and explanations, we have required. (2) In our opinion, the annexed Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law. (3) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of the Bank's affairs according to the best of our information and the explanations given to us and as shown by the books of the Bank. (4) In our opinion, the books of account have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act. 1913. (5) The information and Explanations required by us have been found to be satisfactory. (6) The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank. (7) The returns received from the Branch Offices of the Bank have been found adequate for the purposes of this audit. (8) The Profit and Loss Account shows a true balance of Profit and Loss for the period covered by such account.

Bombay, Date 6th March, 1956.

**KHARE & Co.,**
*Chartered Accountants.*

## सहकारी कायद्याचें कलम ५७

लेखक : स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी ; पुणें.

मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कलम ५४ अगर ५४ अ अन्वयें होणाऱ्या लवाद निवाड्यांचे कामीं दिवाणी अगर रेव्हेन्यु न्यायालयास हस्तक्षेप करणेचा अधिकार आहे किंवा काय ह्याबाबतचा विचार प्रस्तुत लेखांत करणेचें योजिलें आहे. रजिस्ट्रार अगर त्यांनीं नेमलेले नॉमिनी अगर कानू ३२ अन्वयें नेमलें जाणाऱ्या लवाद बोर्डापुढें कलम ५४ अन्वयें लवाद दावा चालविला गेल्यावर त्याकामीं निर्णय होऊन लवाद हुकुमनामा केला जातो. कलम ५४ अन्वयें होणाऱ्या लवाद हुकुमनाम्यावर कलम ५४ अ अन्वयें मुंबई सहकारी ट्रायब्यूनला योग्य वाटल्यास सदरच्या लवाद हुकुमनाम्यांत योग्य ते फेरफार करणेचा, अगर लवाद हुकुमनाम्याबाबतचा हुकूम रद्द करणेचा अगर जरूर तो हुकूम करणेचा अधिकार आहे. रजिस्ट्रार्स नॉमिनींनें लवाद दाव्यांचा निर्णय दिला असल्यास व संबंधी पक्षकारांस त्यांत फेरबदल करून घेणेचा असल्यास कलम ५६ अन्वयें मुंबई सहकारी ट्रायब्यूनलकडे अपील करणेची तरतूद केलेली असून लवाद बोर्डानें लवाद दाव्याचा निर्णय दिलेला असल्यास त्या हुकुमनाम्याविरुद्ध मुंबई सहकारी ट्रायब्यूनलकडे तपासणी अर्ज करणेचा अधिकार कलम ५४ अ अन्वयें पक्षकारांना आहे. अशा निर्णयानंतर मात्र दिवाणी कोर्टाकडे अगर रेव्हेन्यु कोर्टाकडे दाद मागून दिलेल्या निर्णयांत बदल करून अगर निर्णय रद्द करून घेतां येत नाहीं. सदरचा निर्णय हा अंतिम स्वरूपाचा समजला जातो. सहकारी सोसायट्यांच्या कलम ५७ मध्यें त्याबाबत स्पष्ट उल्लेख केलेला असून असे लवादनिवाडे अंतिम असें समजले जातात व त्या निर्णयांत ढवळाढवळ करणेचा अगर अन्य कसलाहि फेरबदल करून मागणेसाठीं दिवाणी अगर मुलकी कोर्टांत पक्षकारांस दाद मागतां येत नाहीं. कलम ५४ अन्वयें अथवा कलम ५४ अ अन्वयें दिलेले हुकुमनामे रद्दबातल करून मागणेसाठीं अगर मिळणेसाठीं अगर त्यांत फेरबदल करून मिळणेसाठीं पक्षकारांना दिवाणी कोर्टाकडे जातां येत नाहीं व हे निर्णय कायद्याप्रमाणें अंतिम असेच ठरविले गेले आहेत. मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कलम ५७ प्रमाणें व सिव्हिल प्रोसिजर कोडाच्या कलम ९ प्रमाणें दिवाणी कोर्टाकडे संबंधी पक्षकारांना दाद मागणेचा मार्गच बंद केलेला आहे. वरील विवेचनावरून हें ध्यानांत येईल कीं एकाद्या पक्षकारानें अथवा दाव्यांतील संबंधी सहकारी संस्थेनें एकादा झालेला लवादहुकूम रद्दबातल आहे असें ठरवून मिळणेसाठीं दिवाणी कोर्टांत दावा आणल्यास दिवाणी कोर्टांत सदरच्या स्वरूपाचा दावा चालणार नाहीं अगर दिवाणी कोर्टास त्याबाबत दावा चालविणेचा अधिकार नाहीं. ...ादी सहकारी संस्था व तिचा सभासद ह्यांचे दरम्यान उपस्थित झालेल्या वादाचा निर्णय करतांना सदरचा सभासद मयत झाल्यास त्याचे कायदेशीर वारस कोण आहेत ह्याबाबत लवादांस निर्णय देण्याचा अधिकार आहे व अशा निर्णयाचे कामीं लवादांनीं जरी चुकीचा निर्णय दिला असला तरीहि त्याबाबत दिवाणी कोर्टास ढवळाढवळ अगर हस्तक्षेप करणेचा अधिकार नाहीं. कलम ५४ अन्वयें नमूद केलेल्या बाबींव्यतिरिक्त मुद्यांचा निर्णय लवाद कोर्टानें चुकून केला असल्यास सदरचा निर्णय देतांना लवाद कोर्टानें अधिकारक्षेत्राबाहेरील गोष्टींचा विचार केलेला असल्यामुळें संबंधीं पक्षकारांवर बंधनकारक होत नाहीं. तसेंच बिगर सभासदांचे विरुद्ध लवाद कोर्टास कांहींहि हुकूम करणेचा अधिकार लवाद कोर्टास ठेवलेला नाहीं. गैरसमजुतीनें अथवा चुकीनें बिगर सभासदाविरुद्ध लवाद दाव्याचे कामीं लवाद कोर्टानें निर्णय दिला असल्यास संबंधीं पक्षकारांस दिवाणी कोर्टाकडे योग्य तो दावा आणून सदरचा निर्णय फिरवून घेतां येतो; कारण लवाद कोर्टानें अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन बेकायदे-शीरपणें निर्णय दिलेला असलेमुळें दिवाणी कोर्टास हस्तक्षेप करणेचा अगर दाव्याची शहानिशा करणेचा अधिकार आहे. कांहीं पक्षकार लवाद निवाड्यांचें बजावणीचें काम लांबणीवर पडावें या हेतूनें लवाद हुकुमनामे झाल्यावर दिवाणी कोर्टाकडे धांव घेवून खोट्या मजकुराची रचना करून व लवाद कोर्टानें अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन लवाद हुकूमनामा केलेला आहे अशा मजकुराची रचना करून दिवाणी कोर्टास दाव्याचा निर्णय करणेचा अधिकार आहे असें भासविणेचा प्रयत्न करतात. परंतु तें अंतीं सफल होत नाहींत.

---

## दि डनलॉप रबर कं. (इंडिया) लि.

वरील कंपनीस १९५५ मध्यें ९६,७२,१५४ रु. निवळ नफा झाला. भागदारांना १५% डिव्हिडंड मिळालें. कंपनीच्या वार्षिक सभेंत मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. सेसिल स्टॅक, हे म्हणाले:—

"१९५४ साल हें कच्चया रबराच्या वापराच्या दृष्टीनें कंपनीचें 'रेकॉर्ड' वर्ष झालें होतें; पण १९५५ मध्यें त्यांत आणखी १०% वाढ झाली. तरी सुद्धां, कंपनीला पक्का माल पुरविण्यांत अडचण भासली. वाढती मागणी भागविण्यासाठीं उत्पादन पुष्कळच वाढवावें लागेल. वहातुकीची असमाधानकारक व्यवस्था व रेल्वे वाघिणींचा तुटवडा, ह्यामुळें तयार मालाच्या वाटपांत व्यत्यय आला; येत्या कांहीं वर्षांत हा प्रश्न अधिकच बिकट होत जाणार, असें दिसतें.

"गेल्या कांहीं वर्षांत रबराच्या धंद्यामध्यें संशोधन मोठ्या प्रमाणावर चालूं आहे; कोणत्याहि कारखानदाराला स्थिर राहून चालणार नाहीं. आपल्या कंपनीला ग्रेट ब्रिटन, कॅनडा, युनायटेड स्टेट्स, जर्मनी, फ्रान्स आणि मलाया ह्या देशांतून डनलॉप करीत असलेल्या संशोधनाचा आयता फायदा मिळत आहे. त्यामुळें, उत्पादनाची पद्धत, यंत्रसामुग्री व माल ह्या बाबतींत आपला कारखाना अद्ययावत् राहूं शकतो. भारतांतील रबर कारखानदारांना १९५५ मध्यें २७,५४२ टन कच्चें रबर लागलें, त्यापैकी स्थानिक उत्पादन २२,४८१ टन कच्चें रबर पुरवूं शकलें. म्हणजे, सुमारें ५,००० टन कच्चें रबर आयात करावें लागलें. हिंदी कच्च्या रबराची किंमत नियंत्रित आहे आणि आयात रबर महाग पडतें. आपल्या कंपनीनें १९५५ मध्यें २,३६८ कच्चें रबर आयात केलें. पण सरकारकडून आयात परवाने वेळेवर मिळण्याच्या अडचणीमुळें, कंपनीजवळील साठा कांहीं कांहीं वेळां धोकादायक पातळीपर्यंत पोंचला होता."

तमाम दंतरोगांवर
म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

## विजेच्या भारी यंत्रसामुग्रीचा कारखाना

भारतीय सरकारचे उत्पादनमंत्री श्री. के. सी. रेड्डी ह्यांनीं भोपाळला जाऊन तेथें काढण्यांत येणाऱ्या सरकारी मालकीच्या कारखान्याच्या जागेची पहाणी केली. भोपाळ येथें विजेच्या भारी यंत्रसामुग्रीचा कारखाना काढण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्या कारखान्यासाठी २५ कोटी रुपयांचें भांडवल लागणार आहे. प्रत्यक्ष उत्पादनास १९६० सालीं प्रारंभ होईल. कारखान्यासंबंधीं अधिक माहिती सांगतांना श्री. रेड्डी म्हणाले कीं, कारखान्याच्या उभारणीसाठी जरूर असणारी प्राथमिक तयारी बहुतेक पूर्ण होत आली आहे. तज्ज्ञांनीं जागेची निवडहि केलेली आहे. ह्यासंबंधीं तांत्रिक सल्लामसलत देणारे तज्ज्ञ आपला तपशीलवार अहवाल भारतीय सरकारकडे नोव्हेंबरपर्यंत सादर करतील असा अंदाज आहे. त्यानंतर अहवालाचा विचार करून सरकार पुढील महिन्यांत आपला निर्णय जाहीर करील. अहवाल तयार करण्याच्या कामीं भारतीय तज्ज्ञांचीहि मदत घेण्यांत येत आहे. ब्रिटनमधील ज्या तज्ज्ञांकडून अहवाल मागविण्यांत आला आहे, त्यांना त्याकामीं मदत करण्यासाठी म्हणून भारतीय तज्ज्ञांचीं दोन प्रतिनिधिमंडळें ब्रिटनला पाठविण्यांत आलीं आहेत. अहवाल तयार करतांना सुद्धां प्रत्येक अवस्थेंत ब्रिटनच्या सल्लागारांनीं भारतीय तंत्रज्ञांना सहकारी करून घेतलें पाहिजे असें ब्रिटिश सरकार आणि भारतीय सरकार ह्यांच्यांत ठरलें आहे. त्यामुळें अगदीं प्राथमिक स्वरूपाच्या रूपरेषेपासून तों तहत बारीकसारीक सर्व तपशीलापर्यंत सर्व बाबतींत भारतीय तज्ज्ञांना उत्तम माहिती होईल. त्याचप्रमाणें कारखान्याच्या प्रत्यक्ष उभारणीच्या कार्यांतहि भारतीय लोकांना सहकारी करून घेण्याकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येत आहे. अवजड व भारी विजेची यंत्रसामुग्री बनविण्याच्या बाबतींत भारत अद्याप अननुभवी आहे. अर्थातच अशा प्रकारचा कारखाना काढल्यानंतर तो चालविण्यासाठी शिकून तयार झालेल्या माणसांची गरज लागेल. कारखान्याच्या योजनेच्या अहवालापासून ते तो उभारण्याच्या अवस्थेपर्यंत प्रत्येक बाबतींत भारतीय तंत्रज्ञ तयार झाले म्हणजे कारखान्याविषयीं भारत पूर्णपणें स्वावलंबी होईल.

---

## रशिआंतील एंजिनिअरिंगचें शिक्षण

अमेरिकेच्या कॉंग्रेसच्या अणुशक्तीविषयक कमिटीपुढें सादर करण्यांत आलेल्या पुराव्यावरून अणुशस्त्रांच्या स्पर्धेत रशिआ अमेरिकेच्या फार पुढें आहे असें दिसून आलें आहे. तथापि ह्याहिपेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे रशिआ एंजिनिरिंगच्या व तंत्रज्ञांच्या शिक्षणाच्या बाबतींतहि अमेरिकेच्या पुढें आहे असें दिसत आहे. ह्या पुराव्यावरून असें आढळून येतें कीं रशिआंत एंजिनिअर्सची संख्या झपाट्यानें वाढत आहे. १९२० सालीं रशिआंत शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या एंजिनिअर्सची संख्या अवघी ४१,००० होती. १९५४ सालीं त्यांची संख्या ५,४१,००० इतकी झाली. म्हणजे ह्या ३४ वर्षांच्या कालावधींत एंजिनिअरांच्या संख्येंत १,३०० टक्क्यांनीं वाढ झाली. ह्याच कालखंडांत अमेरिकेंतील एंजिनिअरांच्या संख्येंत २,१५,००० पासून अवघी ५,००,००० पर्यंत वाढ झाली. १९५० सालीं एंजिनिअरिंग ह्या विषयाचें उच्च शिक्षण देणाऱ्या रशिअन संस्थांतून २८,००० विद्यार्थी शिकत होते. १९५५ सालीं त्यांची संख्या ६३,००० वर आली. ह्याच पांच वर्षांच्या काळांत एंजिनिअरिंगचें शिक्षण घेणाऱ्या अमेरिकन विद्यार्थ्यांच्या संख्येंत मात्र घट झालेली दिसून येते. १९५० सालीं अमेरिकन संस्थांमधून ५२,००० एंजिनिअरिंगचे पदवीधर बाहेर पडले; १९५५ सालीं त्यांची संख्या २३,००० वर आली. अमेरिकेंत दरसाल ७०,००० एंजिनिअर्स व शास्त्रज्ञ शिकून तयार होतात. रशिआंत दरसाल १,२०,००० एंजिनिअरिंगचे पदवीधर तयार होतात. शास्त्रीय विषय आणि गणित हे विषय शिकविणाऱ्या वाकबगार दुय्यम शिक्षकांच्या संख्येंत अमेरिकेंत गेल्या पांच वर्षांत ५३ टक्के घट झालेली आहे. उलटपक्षीं, दुय्यम शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येंत मात्र १६ टक्के वाढ झालेली आहे. अमेरिकन हायस्कुलांपैकीं ५३ टक्के शाळांतून पदार्थविज्ञानशास्त्र हा विषय शिकविण्यांतच येत नाहीं, आणि सरासरी निम्म्यां शाळाच रसायनशास्त्र हा विषय शिकवितात. अमेरिकेंतील २,५०,००० ते ४,००,००० विद्यार्थ्यांना गणित व शास्त्रें हे विषय शिकविणारे शिक्षक त्या कामाला लायक असे नाहींत. ह्यासंबंधीं अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट मि. डलेस ह्यांनीं असे उद्गार काढले कीं, रशिआनें चालविलेल्या शस्त्रांच्या निर्यातीपेक्षां रशिअन तज्ज्ञांच्या निर्यातीचा धोका अधिक मोठा आहे.

---

## इराणच्या शहांच्या शेतीसाठी परदेशी शेतकऱ्यांना पाचारण

इराणच्या शहांनीं आपल्या इस्टेटींवर स्थाइक होण्यासाठी जपान, जर्मनी आणि इटली येथील ७५ शेतकऱ्यांच्या कुटुंबांना पाचारण केलें आहे. जमीन, पाणी, शेतीची यंत्रसामुग्री व भांडवल त्यांस पुरविण्यांत येईल; येण्याजाण्याचा व इतर खर्चहि त्यांना दिला जाईल. इराणी लोकांना ह्या परदेशीय शेतकरी कुटुंबांकडून बरेंच शिकतां येईल अशी शहांची अपेक्षा आहे. शहांची स्वतःची इस्टेट १,००० खेड्यांवर, २० ते ३० लक्ष एकर जमिनींवर पसरलेली आहे, व तिची किंमत सुमारें ५० कोटी रुपये होईल. १९५१ पासून, त्यांनीं त्यांतील जमीन शेतकऱ्यांना वाटून देण्यास प्रारंभ केला आहे. त्यामुळें स्वतःची जमीन कसणारांना जमिनीबद्दल आपुलकी वाटेल व तें सामाजिक न्यायास धरून होईल. परदेशी शेतकऱ्यांपैकीं जपानी कुटुंबें इराणच्या उत्तरेकडील चहाच्या मळ्यांवर व भातांच्या शेतांवर स्थाईक होतील. जर्मन व इटालिअन कुटुंबांची सोय पूर्व व पश्चिम इराणांत केली जाईल.

---

## भारतांतील सोन्याचें उत्पादन

१९५४ मध्यें भारतांत २,३९,१६८ औंस सोन्याचें उत्पादन झालें. त्यापैकीं २,२०,५२२ औंस सोनें म्हैसूरमधील खाणींतून काढण्यांत आलें. हैद्राबाद राज्यांतील 'हत्ती' सोन्याची खाण ही एकच खाण इतर ठिकाणच्या खाणींपैकीं चालू खाण आहे; तिच्यांत १८,६४६ औंस सोनें निघालें. म्हैसूर राज्यांतील सोन्याचा अंश असलेला जमिनीचा पट्टा ३ फूट रुंद व ५ मैल लांब आहे. म्हैसूर, नंदिदुर्ग, ऊरगांव आणि चॅंपिअन रीफ अशा चार खाणींत तो पट्टा विभागलेला आहे. ह्या खाणी आतां ९,००० फूट खोल गेल्या आहेत व त्यामुळें धोकादायक होत चालल्या आहेत.

---

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.